# प्रसिध्दी पत्रक

**श्री. देवानंद यशवंत अंभोरे वय ५३ वर्ष, विस्तार अधिकारी, पंचायत समिती सोयगाव, ता सोयगाव हे ५,०००/- रुपयाची लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. देवानंद यशवंत अंभोरे वय ५३ वर्ष, विस्तार अधिकारी, पंचायत समिती सोयगाव, ता सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक ०७/०८/२०१८ रोजी पंचायत समिती सोयगाव, ता. सोयगाव जिल्हा औरंगाबाद. |
| लाचेची रक्कम | :- | ५,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांची वडीलोपार्जीत जमीन असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वलांब योजनेअंतर्गत बांधलेल्या विहीरीच्या अनुदानाचे शेवटचे बील मंजुर करण्यासाठी |

यातील तक्रारदार यांची वडीलोपार्जीत जमीन पोहरी बु. या ठिकाणी असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वलांब योजनेअंतर्गत त्यांनी विहीर बांधलेली आहे. सदर योजनेअंतर्गत अनुदानातील शेवटचे बील मंजुर करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे श्री. अंभोरे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सोयगाव ता. सोयगाव यांनी ५,०००/- रुपये रकमेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांची श्री. अंभोरे यांना त्यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वलांब योजनेअंतर्गत बांधलेल्या विहिरीच्या अनुदानातील शेवटचे बील मंजुर करण्यासाठी ५,०००/- रुपयाची लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक ०७/०८/२०१८ रोजी श्री. देवानंद यशवंत अंभोरे वय ५३ वर्ष, विस्तार अधिकारी, पंचायत समिती सोयगाव, ता सोयगाव, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/- रुपयाची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.०७/०८/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, श्री. देवानंद यशवंत अंभोरे वय ५३ वर्ष, विस्तार अधिकारी, पंचायत समिती सोयगाव, ता सोयगाव, जिल्हा औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष ५,०००/- रुपये लाचेची रक्कम पंचायत समिती सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

(वर्षाराणी पाटील)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.

